“बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा अंतिम आराखडा

संशोधक

नारायण हणमंतराव पांचाळ

एम.ए., बी.एड्., एम.फिल. (भूगोल)

भूगोल विभाग

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद

ता.मुखेड जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.वसंत तुकाराम नाईक

एम.ए., बी.एड्., पीएच.डी., (भूगोल)

विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक

ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर (कोटग्याळ)

ता.मुखेड जि.नांदेड

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

मार्च, २०१६

“बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :

लोकसंख्या किंवा मानवी समूह हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. तो एक बुद्धिमान प्राणी म्हणून ओळखला जातो. मानवाकडे असलेली बौद्धिक क्षमता, कल्पकता, दुरदृष्टी, श्रम करण्याची प्रवृत्ती, शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान या गुणांमुळे तो विविध प्रकारच्या साधनांची निर्मिती करतो व त्याचा उपयोग गरजांच्या पूर्ततेसाठी करून आपले जीवन सुखी व समृद्ध करीत असतो.

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक शाखा म्हणून विकसित झाली आहे. लोकसंख्या भूगोल या विषयाच्या नावावरुन असे लक्षात येते की, मानवी लोकसंख्येच्या, लोकसंख्याविषयक पैलूंचा, लोकसंख्याविषयक अंगाचा अभ्यास केला जातो. दुसरे म्हणजे लोकसंख्या भूगोलात मानवी लोकसंख्येची जी अंगे किंवा पैलू आहेत. त्यावर भौगोलिक घटकाचा, भौगोलिक परिस्थिती अथवा भौगोलिक लोकसंख्याविषयक घटकाचा कसा परिणाम होतो किंवा होत नाही, किंती होतो इत्यादींचा अभ्यास केला जातो. थोडक्यात लोकसंख्या भूगोलात लोकसंख्या विषयक अंगे व भौगोलिक घटक यातील परस्पर परिणामाचा व संबंधाचा अभ्यास केला जातो.

लोकसंख्येच्या अभ्यासाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रदेशातील लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येची वाढ, लोकसंख्येची अनुवंशिक वैशिष्ट्ये, त्यांचे धर्म, भाषा, लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांचे प्रमाण, अर्भकाचे प्रमाण, स्थलांतर, राहणीमानाचा दर्जा, आर्थिक रचना इत्यादी गुण वैशिष्ट्यांसकट तो मानव किंवा मानवी समुदाय सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घेतो किंवा समायोजन करीत असतो. हे लोकसंख्येचे अभ्यास विषय आहेत.

भौगोलिक पर्यावरणाशी लोकसंख्येचे तिच्या गुणवैशिष्ट्यांसह होणारे समायोजन हे लोकसंख्येचे एक महत्त्वाचे अंग आहे. या प्रक्रियेत भौगोलिक परिस्थितीवर किंवा स्वरुपावर लोकसंख्येचाही प्रभाव पडतो. त्याचाही अभ्यास लोकसंख्या भूगोलात केला जातो. उदा.वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पादन तंत्र, उत्पादन प्रमाण, यांत्रिकता इत्यादीमुळे शेती कारखानदारी यामुळे पर्यावरणही वाढता प्रभाव जाणवतो. ध्वनी प्रदूषण, मृदा प्रदूषण, अति जलसिंचनामुळे जमीनीचे

क्षारीकरण, तापमानाची विपरितता अशा अनेक समस्यांचा विचार लोकसंख्या भूगोलात केला जातो. याचा विचार लोकसंख्या भूगोलाच्या आशयाशी आहे.

भौगोलिक घटकांचा मानवी समूह विकास होण्यास हातभार लागत असतो. उदा.केरळला लाभलेले भौगोलिक स्थान, त्यामुळे प्राप्त झालेलेसागर सान्निध्य सम हवामान, मळयाची शेती, मासेमारी, वाहतूक, उद्योग, व्यापार इ. विकास व ऐतिहासिक घटक मानव मूळ प्राकृतिक पर्यावरणात बदल घडवून नवीन संस्कृती निर्माण करीत असतो.

अनुसूचित जाती व जमाती या इतर समाजापासून भिन्न आहेत. भारतीय समाजातील अत्यंत मागासलेल्या समूहाची एक वेगळी ओळख म्हणून त्या लक्ष वेधतात. अनुसूचित जाती-जमातीमध्ये वांशिक पार्श्वभूमीच्या संदर्भात विभिन्नता आढळते. त्या जमातीचे लोक विभिन्न वांशिक, भाषिक व धार्मिक पंथाचे आहेत. विश्वास, श्रध्दा, समारंभ, उत्सव, आर्थिक कार्य, इ. बाबतीत विविधता आढळते. त्यांचे अस्तित्व पर्यावरणाशी निगडित आहे

अभ्यास क्षेत्र :

बिदर जिल्हा कर्नाटकातील महत्त्वाच्या जिल्ह्यापैकी एक जिल्हा आहे. या जिल्ह्यास आंध्र प्रदेश, मेदक, निजामाबाद आणि तेलंगणा राज्याचा काही भाग अशा सीमा लागून आहेत. तसेच महाराष्ट्रातील लातूर, उस्मानाबाद व नांदेड या जिल्ह्याच्या सीमावर्ती भागावर हा जिल्हा वसलेला आहे. बिदर जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°३५’ ते १८°२५’ आणि रेखावृत्तीय विस्तार ७६°४२’ ते ७७°३९’ इतका आहे. बिदर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ५,४४८ एवढे आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार बिदर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १७०३३०० एवढी असून त्यापैकी अनुसूचित जाती (SC) २९८८१२ (१७.५४%) आणि अनुसूचित जमातीची (ST) ची १८२२१९ (१०.७९%) इतकी लोकसंख्या आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे.

२) अभ्यास क्षेत्रातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे वितरण व त्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

३) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या साक्षरतेच्या प्रमाणाच्या माहितीचा शोध घेणे.

४) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या संरचनेचा अभ्यास करणे.

५) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्या स्थलांतराचे प्रमाण व कारणांचा शोध घेणे.

माहिती संकलन :

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या माहितीवर आधारित असून प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती मिळविण्यासाठी बिदर जिल्ह्याचा जनगणना अहवाल, बिदर जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन, कृषी अहवाल, विविध संशोधन पत्रिका, बिदर जिल्हा गॅझेटिअर, विविध संदर्भ ग्रंथ, भारतीय स्थलदर्शक नकाशे, गुगल अर्थ वेबसाईट, शासकीय कार्यालयातील नोंदी, प्रकाशित व अप्रकाशित माहिती इत्यादींचा आधार घेतला जाणार आहे.

संशोधन पद्धती :

1) दर चौ.कि.मी. ला लोकसंख्येची गणितीय घनता काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केलेला आहे.

$$\textbf{गणितीय घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या}}{\text{एकूण क्षेत्रफळ}}$$

2) $$\textbf{लोकसंख्येची पोषण घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या}}{\text{लागवडीखालील एकूण क्षेत्र}}$$

3) आर्थिक घनता काढताना त्या प्रदेशातील लोकसंख्येच्या एकूण गरजा व प्रदेशाची एकूण उत्पादकता याचा विचार केला जातो व या दोन्हीचे गुणोत्तर म्हणजे आर्थिक घनता होय.

$$\textbf{आर्थिक घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या x दरडोई गरजा}}{\text{एकूण क्षेत्रफळ x दर चौ.कि.मी.ची उत्पादकता}}$$

3) **लोकसंख्या वाढीचा शेकडा दर (Population Growth Rate)**

एखाद्या देशातील दोन सलग जनगणनेनुसार मिळालेल्या लोकसंख्येच्या आकडेवारीवरून लोकसंख्या वाढीचा दर काढला जातो. हा दर काढण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला जातो.

$$r = \frac{P_1 - P_0}{P_0} \times 100$$

खुलासा -

r = लोकसंख्या वाढ (टक्के)

P_0= दोन जनगणनेपैकी सुरुवातीच्या जनगणनेनुसार असणारी लोकसंख्या

P_1= दोन जनगणनेपैकी नंतरच्या जनगणनेनुसार असलेली लोकसंख्या

4) **लोकसंख्या वाढीचा सरासरी वार्षिक दर**

(Average Annual Population Growth Rate)

$$r + 1 = \sqrt[n]{\frac{P_1}{P_0}} \times 100$$

खुलासा -

P_0= सुरुवातीच्या जनगणनेनुसार असलेली लोकसंख्या

P_1= नंतरच्या जनगणनेनुसार असलेली लोकसंख्या

n= दोन जनगणनेमधील कालखंड (दहापैकी)

r= लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर

5) ढोबळ जन्मदर (Crude Birth Rate)

$$\text{ढोबळ जन्मदर} = \frac{\text{एका वर्षात झालेल्या अर्भकांची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times 1000$$

6) सामान्य जन्मदर (General Birth Rate)

$$\text{सामान्य जन्मदर} = \frac{\text{एकूण अर्भकांची संख्या}}{\text{प्रजोत्पादनक्षम वर्गातील स्त्रियांची संख्या}} \times 1000$$

7) वयसापेक्ष जन्मदर (Age Specific Fentitly Rate)

$$\text{वयसापेक्ष जन्मदर} = \frac{\text{विशिष्ट वयोगटातील स्त्रियांनी जन्म दिलेल्या मुलांची एकूण संख्या}}{\text{त्याच वयोगटातील स्त्रियांची एकूण संख्या}} \times 1000$$

8) प्रमाणित जन्मदर (Standard Birth Rate)

$$\text{प्रमाणित जन्मदर} = \frac{\text{सर्व वयोगटातील स्त्रियांची जन्म दिलेल्या अपत्यांची संख्या}}{10{,}00{,}000} \times 1000$$

9) लिंग गुणोत्तर

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{एखाद्या प्रदेशातील विशिष्ट काळातील एकूण पुरुषांची संख्या}}{\text{त्याच प्रदेशातील त्याच काळातील एकूण स्त्रियांची संख्या}} \times 1000$$

10) ढोबळ मृत्यूदर (Crude Death Rate)

$$\text{ढोबळ मृत्यूदर} = \frac{\text{विशिष्ट प्रदेशात एका वर्षातील मृत्यू संख्या}}{\text{त्या वर्षाच्या मध्यकाळात त्या प्रदेशात असलेली एकूण लोकसंख्या}} \times 1000$$

11) वयसापेक्ष मृत्यूदर (Age Specific Death Rate)

$$\text{वयसापेक्ष मृत्यूदर} = \frac{\text{विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट वयोगटातील विशिष्ट वर्षातील मृतांची संख्या}}{\text{त्याच प्रदेशातील त्याच वयोगटातील त्याच वर्षाच्या मध्यकाळातील लोकसंख्या}} \times 1000$$

प्रस्तुत संशोधन कार्यात वरील पद्धतीचा वापर करून निष्कर्ष काढले जाणार आहेत.

प्रकरण नियोजन

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

प्रकरण दुसरे - बिदर जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक माहिती

प्रकरण तिसरे - अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या वाढ

प्रकरण चौथे - अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे लोकसंख्या वितरण

प्रकरण पाचवे - अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या साक्षरता

प्रकरण सहावे - अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्या संरचना

प्रकरण सातवे - अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे स्थलांतर

प्रकरण आठवे - निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथ

१) Chandana R.C. (1996) 'A Geography of Population Concept', Determinants and Patterns Ralyani Publishers, New Delhi.

२) प्रा.डॉ.विठ्ठल घारपुरे - लोकसंख्या भूगोल, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर

३) भूगोलशास्त्र परिभाषा कोश,(२००१): भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४) भारतीय जनगणना अहवाल

५) बिदर जिल्हा गॅझेटिअर

६) बिदर जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन

७) www.googleearth.world, India, Karnataka, Bidar

८) www.bidar.nic.in.

संशोधक
नारायण हणमंतराव पांचाळ
भूगोल विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.वसंत तुकाराम नाईक
भूगोल विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक
ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर (कोटग्याळ)
ता.मुखेड जि.नांदेड